**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०३ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – संतोष बाबुराव घाडी

माझे वय – ५२ वर्षे,

व्यवसाय – शेती

रा. – कुडोपी मधलीवाडी, ता.मालवण, जि. सिंधुदुर्ग

**<u>सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती यु.आर.हेरवाडे यांचे मार्फत.</u>**

०१. दि. २९/०९/२०२३ रेजी माझ्या वडीलांचे वर्ष श्राध्द माझ्या गावी कुडोपी येथे होते. माझे भाऊजी गुरुनाथ घाडी व त्यांचा मुलगा राहूल घाडी यांना वर्ष श्राध्दासाठी मी निमंत्रण दिले होते त्यानुसार ते माझ्या घरी मोटरसायकलने आले होते. वर्ष श्राध्दाचा कार्यक्रम झाल्यानंतर गुरुनाथ घाडी व त्यांचा मुलगा राहूल घाडी हे त्यांच्या गावी नारिंग्रे येथे जाण्यासाठी निघाले होते. त्यानंतर साधारणपणे ५ ते १० मिनिटानंतर मी आचरा गावामध्ये जाण्यासाठी माझ्या गावावरुन निघालो होतो. माझ्या घरापासून साधारणपणे एक ते दिड किलोमिटर अंतरावरती माझे भाऊजी गुरुनाथ घाडी व माझा भाचा राहूल घाडी हे रस्त्यावरती पडलेले दिसले. त्या दोघांनाही गंभीर दुखापत झालेली होती. राजेश वाळवे याच्या मोटरसायकलचा व त्यांचा मोटरसायकलचा समोरासमोर अपघात झाल्यामुळे त्यांना गंभीर दुखापती झाल्या होत्या. गुरुनाथ घाडी व राहुल घाडी यांच्याशिवाय मला घटनास्थळावरती कुणीही दिसले नव्हते. तेथून मी घरी परत आलो, गणेश शांताराम वाळवे यांचा रिक्षा घेवून स्पॉटवरती परत आलो होतो. मी सदर रिक्षामध्ये गुरुनाथ घाडी व राहूल घाडी यांना घेवून कणकवली येथे गेटवेल हॉस्पीटल येथे गेलो होतो. सदर अपघाताची फिर्याद गुरुनाथ घाडी यांनी पोलीस स्टेशनला दिली होती. मला राजेश वाळवे दाखविल्यास मी त्याला ओळखू शकतो. आजरोजी राजेश वाळवे न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. यु.बी.कुळकर्णी यांचे मार्फत.**

०२. मी आजरोजी न्यायालयात आल्यानंतर माझे पोलीस टिप्पण वाचून पाहिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, म्हाळाच्या जेवणासाठी गावातील व्यक्ती दुपारी ३.३० ते ४.०० पर्यंत येतात. हे म्हणणे खरे आहे की, म्हाळासाठी जेवायला येणाऱ्या लोकांची उठबस करण्याचे काम ज्याच्या घरी म्हाळ आहे त्या घरातील प्रौढ व्यक्ती करत असतात. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या घरातील प्रौढ व प्रमुख व्यक्ती आहे. माझ्या घरी रात्री भजन असल्यामुळे मी लाडू आणण्यासाठी आचरा येथे गेलो होतो. भजन रात्री ७.०० ते ८.०० च्या दरम्यान होते. हे म्हणणे खरे आहे की, कुडोपी ते आचरा हे १२ किलोमिटर अंतर आहे. हे म्हणणे खरे आहे की, कुडोपी येथून आचरा येथे जावून परत येण्यासाठी साधारणपणे एक तास लागतो. साक्षीदार पुन्हाहून सांगतो की, एक ते दिड तास लागतो. हे म्हणणे खरे नाही की, म्हाळाचा कार्यक्रम संपल्यानंतर मला तातडीने आचरा येथे जाण्यासाठी कुठलेही कारण नव्हते. मला पोलीसांना जबाब देताना मी आचरा येथे लाडू आणण्यासाठी गेलो होतो ही बाब सांगण्यासाठी कुठलीही अडचण नव्हती.

०३. पोलीसांनी माझा जबाब घेतला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, दि. २९/०९/२०२३ रोजी मी आचरा येथे जाण्यासाठी निघालो होतो हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, रस्त्यामध्ये माझे भाऊजी गुरुनाथ घाडी व भाचा राहूल घाडी पडलेले पाहिले होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी अपघातासंदर्भात काहीही पाहिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या भाऊजीचा अपघात झाल्यामुळे मी न्यायालयामध्ये खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला मिळालेल्या चुकीच्या माहितीच्या आधारे मी न्यायालयामध्ये चुकीची माहिती सांगितलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.

न्यायालयीन प्रश्न क्र.१ – तुम्ही अपघात होताना स्वतः पाहिला होता का ?

उत्तर – मी अपघात होताना स्वतः पाहिलेला नाही.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण : मालवण
दिनांक : १७/०३/२०२५

महेश रा. देवकते
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालवण